# भारताचे संविधान (एकशे पाचावी सुधारणा) अधिनियम, २०२१

[१८ ऑगस्ट, २०२१.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :-

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.**(१) या अधिनियमास, संविधान (एकशे पाचावी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास* अंमलात येईल.

**अनुच्छेद ३३८ख ची सुधारणा.**

**२.** संविधानाच्या अनुच्छेद ३३८ख मधील खंड (९) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल,जसे की :-

"परंतु असे की, या खंडातील कोणतीही गोष्ट, अनुच्छेद ३४२क च्या खंड (३) च्या प्रयोजनार्थ लागू असणार नाही."

**अनुच्छेद ३४२क ची सुधारणा.**

**३.** संविधानाच्या अनुच्छेद ३४२क मध्ये,-

(क) खंड (१) मधील, "या संविधानाच्या प्रयोजनार्थ, जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग" या मजकुराऐवजी, "जे केंद्र सरकारच्या प्रयोजनार्थ, केंद्रीय सूचीमधील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) खंड (२) नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल, जसे की, :-

"*स्पष्टीकरण.*- खंड (१) व खंड (२) च्या प्रयोजनार्थ, "केंद्रीय सूची" या शब्दप्रयोगाचा अर्थ, केंद्र सरकारद्वारे व साठी तयार केलेली व ठेवलेली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांची सूची, असा आहे.

---

*अधिसूचना क्र.एस.ओ. ४०६३ (इ), दिनांक १५.९.२०२१ अन्वये (दि. १५.९.२०२१ रोजी व तेव्हापासून)

(३) खंड (१) व खंड (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र, ज्यातील नोंदी, केंद्रीय सूचीपेक्षा वेगळ्या असू शकतील अशी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांची सूची, त्याच्या स्वत:च्या प्रयोजनार्थ, कायद्याद्वारे, तयार करील व ठेवील."

**अनुच्छेद ३६६ ची सुधारणा.**

४. संविधानाच्या अनुच्छेद ३६६ मध्ये, खंड (२६ग) च्या ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल, जसे की :-

"(२६ग) "सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग" याचा अर्थ, असे मागासवर्ग की जे, केंद्र सरकारच्या किंवा राज्याच्या, किंवा यथास्थिती, संघराज्य क्षेत्राच्या प्रयोजनार्थ, अनुच्छेद ३४२क अन्वये तसे असल्याचे मानण्यात आले आहेत, असा आहे."